RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On : 12 September 2016 :: Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 14 September, 2016

अजायब ✵ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : चौदा | अंक : तीसरा | सप्टेंबर २०१६



मनास वश करणे (सत्संग) 5

प्रश्नोत्तरे (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 27

धीर आणि संतोष (गोष्ट) 31

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या जन्मदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

मनास वश करणे

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, हुजूर स्वामीजी महाराजांची वाणी
दिल्ली, उत्तर भारत – १४ मार्च १९८६

मी त्या महान परमात्म्याचे आभार मानतो जो सावन–कृपालजींच्या स्वरूपात येऊन आपल्यासमोर बसलेल्या या गरीब आत्म्यावर अपार कृपा केली. ती वेळ, तो दिवस अतिशय सुखप्रद होता ज्यावेळी मला महाराज सावन सिंहजींविषयी कळले. मी त्यांच्याकडे गेलो. त्यांच्या मनमोहक सुंदर चेहऱ्याने मला इतके आकर्षित केले की तो चेहरा माझ्या स्मृतीतून आणि नजरेपासून कधीच दूर होऊ शकला नाही. त्यावेळेच्या माझ्या अवस्थेचे वर्णन मी एका भजनामध्ये असे केले आहे:

लक्खां शक्लां तकिया अक्खियां ने कोई नजर मेरी विच खुबदी ना।

बाबा बिशनदासजींप्रती माझ्या अंतरमनात ओतप्रोत आदरभाव भरलेला आहे ज्यांनी माझे अध्यात्मिक जीवन उभारण्यासाठी खूपच मेहनत घेतली. मी बाबा बिशन दासजींनादेखील महाराज सावन सिंहजींच्या चरणी नेले की या जगात हे एक महान संत अस्तित्वात आहेत.

मी नेहमी सांगतो की बाबा बिशनदासजी अतिशय दिलखुलास होते. त्यांची कुपमंडुक वृत्ती नव्हती. ज्याप्रमाणे एक हंस उडत–उडत एकदा एका विहिरीच्या काठावर येऊन बसला. तेथे एक बेडूक चिखलामध्ये अडकून बसला होता. हंसाने बेडकास विचारले,''या चिखलामध्ये तुझी अतिशय वाईट अवस्था आहे. येथे खूप दुर्गंधी येत आहे. तुला मी समुद्रावरून फिरवून आणतो, तेथे खाण्यासाठी मोती आहेत. तो माझा देश खूप सुंदर आहे.'' विहिरीमध्ये एक लहानसा फेरा मारून बेडकाने हंसास विचारले, ''तुझा समुद्र एवढा मोठा आहे काय? त्यात असे पाणी आहे का?'' हंस म्हणाला, ''याहूनही समुद्र मोठा आहे. त्यातील पाणी खूप साफ आहे.''

त्याहूनही मोठा फेरा मारून बेडकाने हंसास विचारले की,''समुद्र एवढा मोठा आहे का?'' हंसाने तरीही नकार दिला. बेडूकाने विहिरीच्या दुसऱ्या टोकास उभे राहून हंसास विचारले, ''तुझा समुद्र एवढा मोठा आहे काय?'' हंस म्हणाला,''होय, याहूनही मोठा आहे. तू माझ्यासोबत चल. मी तुला समुद्र दाखवू शकतो. त्याच्या सौंदर्याचे वर्णन केले जाऊ शकत नाही, त्यास पाहूनच आपण समजू शकतो. तेथे गेल्यावर तुझे जीवनमान सुधारेल, तू मौज–मस्ती करू शकशील.'' ते ऐकून बेडूक म्हणाला,''समुद्र याहून मोठा असूच शकत नाही. तू खोटारडा व बेईमान आहेस.''

या बेडकासारखीच आपली बुद्धी सिमीत असते. जी गोष्ट आपणांस समजत नाही, त्या गोष्टीस मानण्यास आपण तयार नसतो. त्या हंसाप्रमाणे परमात्मा महान आत्म्यांस संतरूपाने या जगामध्ये पाठवितो. ते संत आपणांस समजावतात, ''तुमचा देश खूप उच्च, पवित्र आणि शांतिमय आहे. तेथे जन्म–मृत्यू नाही. चला! त्या देशामध्ये आम्ही तुम्हांस नेण्यासाठी आलो आहोत. तेथे तुम्ही तुमचा वेळ निवांतपणे व्यतीत करू शकाल, कारण ते तुमचेच घर आहे.'' परंतु त्यांच्या सोबत जाण्यासाठी आपण राजी होत नाही. हंसास खोटे ठरविणाऱ्या बेडकाप्रमाणेच आपली अवस्था असते.

गुरू नानकदेवजी, कबीर साहेब आणि आपल्या सतगुरू महाराजजींप्रमाणे अनेक महान महात्मा या जगामध्ये आले. सर्वांनी या जगामध्ये येऊन शब्द–नामाचा प्रचार केला, आपल्या खऱ्या घराची माहिती आपणांस दिली व सांगितले, ''या प्रियजनांनो! आम्ही तुम्हाला तुमच्या घरी, सचखण्डास घेऊन जातो. तुम्हांस तेथे एकटे न पाठविता तेथे जाण्याच्या प्रवासामध्ये आम्ही तुमची सोबतही करणार आहोत.'' परंतु आपल्यापैंकी किती लोकं महात्म्यांबरोबर जाण्यासाठी तयार असतो. याचे कारण म्हणजे आपण मनाच्या जाळ्यामध्ये अडकलेलो आहोत. मनाचे जाळे अतिशय मजबूत असून, ते तोडणे सोपे काम नाही.

रामचंद्रजींना वशिष्ट मुनींनी सांगितले, ''जर कोणी मनुष्याने म्हटले की एका बहादर मनुष्याने आपल्या डोक्यावर इतका अवाढव्य हिमालय पर्वत उचललेला आहे, जरी ही विश्वास ठेवण्यासारखी गोष्ट नाही, तरीही विश्वास ठेवू की कदाचित परमात्म्याने असा एखादा शूरवीर जन्मास घातलाही असेल. त्यानंतर जर कोणी म्हटले की एका मनुष्याने समुद्रामधील सर्वच्या सर्व पाणी पिऊन टाकले आहे, खरेतर ही गोष्टही विश्वास ठेवण्यायोग्य नाही, तरीही त्यावर विश्वास ठेवूया की कदाचित समुद्राचे सर्वपाणी पिऊ शकणाऱ्या मनुष्यास परमात्म्याने जन्मास घातले असेलही. परंतु जर कोणी म्हणत असेल की मी माझ्या **मनास वश करून घेतले** आहे, तर त्यावर विश्वास ठेवण्यास मी तयार नाही.''

परंतु याचा अर्थ असाही होत नाही की आजपर्यंत कोणीच आपल्या **मनास वश केलेले** नाही. जगामध्ये गुरूमुख आणि मनमुख अशा दोन प्रकारचे लोक जन्मास येतात. गुरूमुख नेहमी सांगतात की आपणांस अयोग्य मार्गी नेऊन भरकटवणारी शक्ती आपल्या अंतरामध्ये असून त्यावर उपाय करू शकणारे औषधदेखील आपल्या अंतरामध्येच ठेवलेले आहे. आपण अंतरामध्ये जाऊन ते औषध खाणे गरजेचे आहे.

तुमच्या समोर स्वामीजी महाराजजींची वाणी सादर केली जात आहे. या वाणीमध्ये आपण प्रेमाने सांगत आहात, ''तुम्ही कितीही जप-तप, पूजा-अर्चना करा, परंतु ते सर्व केल्याने मन वश होत नाहीच, उलट आपल्या अंतरामध्ये अहंकार निर्माण होतो की मी एवढे दान, जप-तप केले आहे.'' महात्मा सांगतात:

किया कराया सब गया, जब आया अहंकार।

गुरू नानकदेवजी महाराज त्यांच्या वाणीमध्ये सांगतात:

तीर्थ व्रत और दान कर, मन में धरे गुमान।
नानक नेह फल जात है ज्यों कुंचर स्नान।।

जसे आपण हत्तीला अंघोळ घालून स्वच्छ केल्यानंतर तो पाण्याबाहेर येऊन स्वत:च्या अंगावर चिखल–माती टाकतो. आपलीदेखील हिच अवस्था आहे. स्वामीजी महाराज या वाणीमध्ये सांगत आहेत की ज्या कोणी मनास वश करून घेतले आहे, ते शब्द–नामाच्या औषधाच्या मदतीनेच केले आहे.

धुन सुन कर मन समझाई।। धुन सुन कर मन समझाई।।
कोटि जतन से यह नहिं माने। धुन सुनकर मन समझाई।।

स्वामीजी महाराज प्रेमाने समजावत आहेत,''भले तुम्ही जप–तप तसेच इतर करोडो उपाय केले तरीही तुम्ही तुमच्या **मनास वश करू** शकणार नाही. आपल्या अंतरातील कमळ उलट्या अवस्थेत आहे, त्यामधून टपकणारे अमृत माया आणि मायेचे भोग पीत आहेत. आपला आत्मा अजून निर्बल आहे. जेव्हा तो घंटा व शंखाचा आवाज ऐकतो तेव्हा त्याच्यातील कमतरता दूर होऊ लागतात.'' गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

ऊंधे भांडे कछु न समावे, सीधे पवे अमृत धार।।

ध्यान–अभ्यास केल्याने आपले हृदय कमळ जेव्हा सरळ होते, तेव्हा सहस्रदल कमळाचा मार्ग उघडतो. अंतर्यात जाणारा मार्ग एखाद्या पुस्तकाप्रमाणे उघडतो. आपल्या हृदयात कोणतीही शंका बाकी राहत नाही. ज्याप्रमाणे आज आपणांस अंतरात जाणे अवघड वाटते, त्याचप्रमाणे नंतर अंतरामधून आपले लक्ष बाहेर आणणेही अवघड जाते. जेव्हा आपला आत्मा शब्द–नामाशी एकरूप होतो, तो वरच्या दिशेला मार्गक्रमण करू लागतो व शेवटी तो आपल्या स्वगृही म्हणजे त्रिकुटीमध्ये पोहोचतो, जे मनाचे घर असते.

त्रिकुटीमध्ये पोहोचल्यावर मनास स्वत:च्या अवगुणांचा आणि विषय–विकारांच्या स्वादाचा विसर पडतो. त्यावेळी मन जागृत होते की मी किती मोठ्या घराचा मालक आहे! मी विनाकारणच या जगातील विषय–विकारांच्या जंगलामध्ये आणि मान–मोठेपणाच्या जाळ्यात अडकून पडलो.

या दोन मार्गांना एकत्र आणणारा एक बंकनाल नावाचा वक्र–मार्ग आहे, जो त्रिकुटी व सहस्त्रदलकमळाच्या मध्ये आहे. महात्मा आपणांस प्रेमाने सांगतात की जेव्हा आपण मनास त्रिकुटीमधील ध्वनी ऐकवतो, त्यास शब्दाचा आस्वाद मिळतो, त्यास त्याच्या घरी पोहचवितो, तेव्हाच ते जागृत होते.

तुम्ही पाहा! जर एखादा वेडा मनुष्य असेल तर आपण त्यावर दया करणे जरूरीचे आहे. त्यास जर आपण घरी आणले तर तो स्वस्थ बसणार नाही. डॉक्टराने उपचारादाखल त्यास कितीही चांगले औषध दिले, तरी ते औषध फेकून देईल, आपणांस तो मारहाण करू लागेल, त्रास देईल. तरीही आपण काही काळ त्रास सहन करीत त्यास औषध दिले, त्यावर प्रेम केले तर त्यास शुद्ध येते. तेव्हा तोच मनुष्य आपणावर प्रेम करू लागतो, आपले आभार व्यक्त करतो. मन जेव्हा स्वगृही पोहचते तेव्हा त्याच्या लक्षात येते की मी विनाकारण या जगातील घाणीमध्ये अडकून पडलो.

स्वामीजी महाराज सांगतात, ''बाह्य जगातील कोणत्याही प्रकारच्या मार्गाने तुमचे मन वश होणार नाही. ते वश झाल्यास केवळ शब्द–नामाच्या आस्वादानेच वश होईल.'' आपण शहरा–बाजारांमध्ये पाहतो की गारूडी लोकं सर्रास सापांना आपल्या गळ्यात घालून फिरत असतात. खरेतर साप खूप विषारी असतात. गारूड्यांची नक्कल करीत जर आपण एखाद्या सापास पकडून गळ्यात घालून फिरू लागल्यास आपणांस लगेचच मृत्यूचे तिकीट मिळेल. गारूड्यास सापाच्या कमजोरीचे ज्ञान असते. ते सापाच्या दातातील वीष काढून टाकतात त्यामुळे साप जिवंत राहतो परंतु तो निरूपद्रवी बनतो.

अशीच अवस्था आपल्या मनाची असते. त्यामुळे आपल्याला मनास मारावयाचे नसून त्याची समजूत घालून त्यास त्याच्या घरी पोहचावयाचे आहे. जे मन अगोदर आपले शत्रू असते, नंतर तेच आपले मित्र बनून राहते. हे सर्व सांगण्याचा हाच हेतू आहे की मनास अंतर्यातील संगीत–राग ऐकवा, शब्द–रस ग्रहण करण्यास द्या, मगच ते मन वश होईल.

जोगी जुक्ति कमावें अपनी। ज्ञानी ज्ञान कराई।।

मी कुणी सांगितलेल्या वा ऐकीवात्य गोष्टी तुम्हांस सांगत नाही आहे. मी अतिशय श्रद्धेने आणि मनोभावे अनेक कर्मकांडे केलेली आहेत. परंतु तसे करणे म्हणजे लोणी प्राप्त करण्यासाठी पाण्यामध्ये रवी घुसण्यासारखेच आहे, कारण लोणी नेहमी दुधापासून बनलेले दही घुसळल्यानेच मिळते, पाण्यापासून नाही. योगींनी परमात्मा प्राप्तीसाठी खूप संघर्ष केला. श्वासांवर ताबा मिळविण्यासाठी त्यांनी प्राणायामाची प्रक्रिया खूप मोठ्या प्रमाणात केली. असे करीत त्यांनी स्वत:चे आयुष्य वाढविले, परंतु जास्तीत जास्त ते पहिल्या मंडळापर्यंत पोहचू शकले. परंतु संतांच्या पारमार्थिक वाटचालीची सुरवातच मुळी येथून होते.

आपले हुजूर महाराज सांगत असत,''एक मनुष्य डोंगर चढणाच्या मधोमध बसलेला असून त्यास त्या डोंगराच्या माथ्यावर जायचे आहे. परंतु तो मनुष्य प्रथम डोंगराच्या पायथ्याशी आला आणि मग त्याने डोंगरावर चढण्यास सुरूवात केली, तर त्यास डोंगर माथ्यावर पोहचण्यासाठी किती वेळ लागेल? परंतु मधोमध असलेल्या ठिकाणावरूनच त्याने वर चढण्यास सुरूवात केल्यास त्याचा खूप वेळ वाचेल.'' याचप्रमाणे परमात्मा आपल्या शरीरामध्ये आहे. तो आपल्या शरीरातील सहा चक्रे किंवा नऊ द्वारांमध्ये नसून, तो आपल्या दोन्ही नेत्रांच्या वरील भागामध्ये आहे. परंतु एखाद्या पूर्ण महात्म्यास शरण गेल्यानेच आपण अंतर्यात जाण्यात यशस्वी होतो.

साधारणपणे या अध्यात्मिक प्रगतीच्या प्रश्नाचे उत्तर आपण लिखाण–वाचन करून मिळविण्याचा प्रयत्न करतो. मी तुम्हांस बाबा बिशनदासजींबद्दल सांगत असतो की त्यांच्याकडे या जगातील पी.एच.डी.ची डिग्री होती. त्यांचा हिंदू–मत, मुस्लीम–मताचा गहन अभ्यास होता. तसेच उर्दु–फारसी आणि इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. ते सांगत असत:

ज्ञानी से प्रभ बीस कोस, तपस्वी से तीस। भक्ता दे हृदय बसे, जोगी दे प्रभ सीस।।

ज्ञानी लोकांपासून परमात्मा वीस कोस तर तप करणाऱ्यांपासून तो तीस कोस दूर राहतो. तपस्या करून योगी लोक इथपर्यंत पोहोचतात, परंतु इथून पुढे गेल्यावरच परमात्म्याची भेट होते. तप करून मी जेव्हा बाबा बिशनदासजींकडे गेलो, तेव्हा ते म्हणाले, ''हे बघ मुला! मनुष्याच्या शरीरामध्ये काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार हे पाच अग्नी अगोदरच प्रज्वलीत आहेत, मग या शरीरास बाह्य अग्नीने तप्त करून काय उपयोग?

साधारणत: तप करण्याच्या विधीमध्ये आपण आपल्या भोवती चोहोबाजूस अग्नी पेटवून ठेवतो. वरती डोक्यावर सूर्यरूपाने पाचवा अग्नी धगधगत असतो. हा विधी दुपारी बारा वाजता सुरू केला जातो. आपआपल्या श्रद्धेनुसार कोणी राम अक्षराचा दहा हजार तर कोणी वीस हजार वेळा जप करतो. कोणाचा यापेक्षा कमीही जप असतो.

बाबा बिशनदासजींकडे मी गेलो असता ते म्हणाले,''जगाने वेद-शास्त्रांचा खूप गहन अभ्यास केलेला आहे. परंतु ते देखील सांगतात की परमात्मा आपल्या अंतर्यात असून आजपर्यंत तो न कोणाला बाह्यजगात प्राप्त झालेला आहे ना भविष्यात कधी होईल. ज्या कोणास तो प्राप्त झालेला आहे, तो अंतर्यातच प्राप्त झालेला आहे आणि तो केवळ अंतर्यातच प्राप्त होईल.''

क्राईस्टने सांगितले होते, ''परमात्म्याचे राज्य आपल्या अंतर्यात आहे. आपण त्यास अंतर्यातच भेटू शकतो.'' मोहम्मद साहेब सांगतात, ''खुदा शाह-रागाच्या जवळ आहे.'' गुरू अमरदेवजी महाराज सांगतात, ''परमात्म्याचे वास करण्याचे ठिकाण, त्याचे खरे मंदिर आपले शरीरच आहे.''

हरि मंदिर ऐहो शरीर है, ज्ञान रत्न प्रकट होए।

लोकांनी योग करण्यामध्ये कसलीच कसर बाकी ठेवली नव्हती. वाचन-पठण करणाऱ्यांनीदेखील काही कसर बाकी ठेवली नव्हती. आपले सतगुरू महाराज सावन उदाहरण देत असत की रावण चारही वेदांचा तज्ज्ञ होता. तो खूप मातब्बर मनुष्य होता. परंतु त्याच रावणाचा उत्तर भारतामध्ये पुतळा

बनवून दरवर्षी जाळला जातो. परस्त्रीयांचे हरण करीत तो मरण पावला. त्याने केलेल्या दुष्कृत्यांमुळे लोकं आजही त्यास माफ करीत नाहीत. हे सर्व सांगण्याचे हेच सार आहे की वाचन–पठण करून जर मन वश झाले असते, तर ते रावणासदेखील वश व्हावयास हवे होते. गुरू नानकदेवजी सांगतात:

नानक कागज लख मणा, पढ़ पढ़ कीजे भाओ।
मस्सू तोट न आवही लेखन पौण चलाओ।
भी तेरी कीमत न पवे हों के वड ओखा नाम।।

आपण प्रेमाने सांगत आहात की तुम्ही भलेही लाखो मण कागदांचे वाचन करा किंवा वायुच्या गतीने लिखाण काम करा तरीही नामाची किंमत आपण करू शकत नाही, कारण नाम या सर्वांहून वेगळीच वस्तू आहे.

तपसी तप कर थाक रहे हैं। जती रहे जत लाई।

परमात्म्याच्या प्राप्तीसाठी जगाने कोणत्याही प्रकारची मेहनत करण्यामागे कसलीच कसर बाकी ठेवली नाही. तपस्वींनी खूप तप केले तर जतिंनी खूप जप केले. घरादाराचा त्याग करून इतरांना ते अहंकाराने सांगतात की आम्ही जती आहोत. परंतु पडद्याच्या पलिकडे जाऊन पाहिल्यास आपल्या लक्षात येते की ही मंडळी किती मलिन आहेत. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

जती सदाई जुगत न जाने, छड बहे घर बार।

जैमिनी ऋषी वेद–व्यासजींचे शिष्य होते. कर्मांच्या फिलॉसॉपीवर जैमिनी ऋषींनी एक पुराण लिहिले. ते पुराण घेऊन जेव्हा ते वेद–व्यासजींकडे गेले, तेव्हा वेद–व्यासजी म्हणाले, ''तू लिहिलेले पुराण खूप छान आहे. परंतु परमार्थाची कमाई करणे याहूनही कठीण कार्य आहे. परंतु ही कमाई केल्याशिवाय मनुष्य परमार्थामध्ये सफल होत नाही.'' जैमिनीऋषी म्हणू लागले, ''नाही! कमाई करण्याची काय गरज? मी चांगले लिखाण करू शकतो. हे पहा ना! मी कर्माची फिलॉसॉपी अतिशय सुलभतेने लिहिली आहे.'' वेद व्यासजी म्हणाले, ''ठिक आहे! वेळ आल्यावर पाहू आपण.''

जैमिनी ऋषी बाहेर एका झोपडीत राहत असत. एके दिवशी वेदव्यासजींनी एका मुलीचे रूप धारण केले आणि जैमिनी ऋषींच्या झोपडीजवळ जाऊन जोर-जोराने आरडाओरड करू लागले. तो आवाज ऐकून जैमिनी ऋषी झोपडी बाहेर आले व त्या मुलीस त्यांनी विचारले,''मुली! तू कोण आहेस?'' ती म्हणाली,''मी एक राजकन्या आहे. माझे सोबती शिकार करत होते. मी रस्ता विसरले आहे. माझ्यावर दया करा. मी एकटी असल्याने मला हिंस्त्र श्वापदे खाऊन टाकतील. तुम्ही मला आसरा द्या.'' सुरूवातीला जैमिनी ऋषींचे विचार शुद्ध होते. ते म्हणाले,''मी कोणाला आसरा देत नाही, माझ्या जवळ राहण्याची परवानगी देत नाही.'' ती मुलगी म्हणाली, ''संत-महात्मा अतिशय परोपकारी असतात. तुम्ही माझ्यावर दया करा व मला राहण्यासाठी आसरा द्या.'' अखेरीस ऋषींनी तिला तिथे राहण्यासाठी जागा दिली.

आपले मन आपणांस अंतरातून एखाद्या वकिलाप्रमाणे शिकवत असते. ऋषींनी विचार केला की चला, आपण झोपडी बाहेर झोपूया व या मुलीस आतमध्ये झोपण्यास सांगूया. जैमिनी ऋषी त्या मुलीस म्हणाले, ''तू आतमधून दरवाजा बंद करून कडी लावून घे. मी जरी तुला आवाज दिला, तरीही तू दरवाजा उघडू नकोस.''

ऋषींना थोडा वेळ बाहेर बसून राहिल्यानंतर त्यांच्या मनामध्ये विचार आला की चला आपण मुलीबरोबर गप्पा माराव्यात जेणेकरून आपणांस रात्र व्यतीत करणे सोपे जाईल, आपणांस काही वाईट कर्म करावयाचे नाही. खरे तर आपला कट्टर शत्रू, आपले मन आपल्या अंतरातच वसत असते. ते आपणांस संकटात टाकते. अखेरीस ऋषींनी तिला हाक मारली की दरवाजा उघड. ती मुलगी म्हणाली, की तुमचाच आदेश होता की मी कोणासाठीही दरवाजा उघडू नये.

सरतेशेवटी ऋषी म्हणाले की, तू जर दरवाजा उघडला नाहीस, तर मी झोपडीचे छप्पर तोडून आतमध्ये येईन. मुलगी म्हणाली, ''तुम्ही वाट्टेल ते

करा पण मी दरवाजा काही उघडणार नाही.'' ऋषींनी जेव्हा झोपडीचे छप्पर तोडून आतमध्ये उडी मारली, तेव्हा त्यांनी पाहिले की आतमध्ये मुलगी वगैरे कोणी नसून मुनी वेद-व्यासजी स्वत: बसलेले आहेत. जैमिनी ऋषी अतिशय लज्जाग्रस्त झाले. वेद-व्यासजी म्हणाले, ''आता तूच सांग! तू कर्मांच्या फिलॉसॉपीवर पुस्तक लिहिले आहेस. तू जर पारमार्थीक कमाई केली असतीस तर तुला हा दग-फटका सहन करावा लागला असता का?''

हे सांगण्याचा हेतू असा आहे की आपण बाहेरून लोकांना दाखवितो की आम्ही जती आहोत, सती आहोत; आमच्या अंतरात खूप सद्गुण आहेत. परंतु वर्तणूक करण्याची वेळ आल्यावर आपणांस लक्षात येत की आपण त्यामधून किती निर्मलतेने बाहेर पडतो.

ध्यानी ध्यान मानसी लावें। वह भी धोखा खाई।।

आता आपण प्रेमाने सांगत आहात की बऱ्याच लोकांचा या मुद्याबाबतीत गैरसमज असतो की ज्या महात्म्यांना हे जग सोडून खूप काळ लोटला आहे त्या महात्म्यांनी परमात्म्यास प्राप्त केले असावे. मग त्या महात्म्यांच्या मूर्त्या समोर ठेवून आपण त्यांचे ध्यान करू लागतो. अशाने तुमच्या अंतरात त्या मूर्तीची प्रतिमा निर्माण होईल, परंतु ते महात्मा काही प्रगट होणार नाहीत. खरे तर आपणांस हे देखील माहिती नसते की जो फोटो एखाद्या महात्म्याचा म्हणून समोर ठेवला जातो तो वास्तविक आहे की नाही.

मुंबईमध्ये शंकराची मूर्ती एका वेगळ्या पद्धतीनेची बनविली जाते तर पंजाबमध्ये निराळ्याच पद्धतीची बनविली जाते. त्यामुळे एका मूर्तीचा दुसऱ्या मूर्तीशी ताळमेळ नसतो. गुरदासपूर येथे जुन्या काळातील दहा गुरूंच्या प्रतिमा मी स्वत: पाहिल्या होत्या, ज्यांचा आज बनविल्या जाणाऱ्या प्रतिमांशी मेळ बसत नाही.

एका माणसाने महाराज सावन सिंहजींना विचारले होते की घरामध्ये तुमची मूर्ती ठेवणे वा तिला धूप-दीप दाखविणे कितपत योग्य आहे? त्यावर

महाराजजी म्हणाले, ''हे ठिक नाही, ते थोतांड आहे. तुम्हांस तुमच्या सतगुरूंची मूर्ती ठेवायचीच असेल तर आपली एखादी वडीलधारी व्यक्ती वा जेष्ठ बंधु म्हणून ठेवा. परंतु तुम्ही जर विचार केला की त्या मूर्तीला पूजल्याने, धूप दिल्याने आपली पारमार्थीक प्रगती होईल, तर हे चूकीचे आहे.

तुम्ही तुमच्या उघड्या नेत्रांनी सूर्याकडे दोन मिनिटे पाहिल्यानंतर तुमचे नेत्र मिटून घेतल्यास, तुमच्या अंतरामध्ये सूर्य नाही तर त्याची प्रतिमा दिसते. त्याचप्रमाणे पणतीच्या दिव्याकडे काहीकाळ एकटक पाहून तुम्ही नेत्र बंद केल्यास अंतरामध्ये ज्योत दिसू लागेल पण दिवा येणार नाही.

याच पद्धतीने तुम्हाला अंतरात मूर्ती दिसू लागल्यास त्या मूर्तीला तुम्ही विचारा की आपण माझा उद्धार कधी करणार? परंतु ती मूर्ती उत्तर देणार नाही, कारण ती निर्जीव आहे. एखादा न्यायाधिश स्वत:चा फोटो खुर्चीवर ठेऊन सुट्टीवर निघून गेल्यास, तो फोटो न्यायदानाचे काम करील काय?

अशाच प्रकारचा आपलादेखील गैरसमज असतो. आपण म्हणतो की आपले पूर्वज या मूर्तींची पूजा करीत होते, त्यामुळे आम्हीदेखील त्यांना मानतो. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

सब गुर पीर हमारे।

महात्मा सर्वच संतांचा आदर करतात. परंतु आपणांस हे देखील सांगतात की तुमचे ईसिप्त मेहनती शिवाय पूर्ण होणार नाही. तुम्ही नाम घ्या, नामस्मरण करा. नामस्मरण, ध्यान आणि अभ्यास ही तीन मुक्तीची साधने आहेत.

नामस्मरणाच्या मदतीने आपण आपले लक्ष तीसऱ्या तिळावर एकाग्र केले पाहिजे. त्याबरोबर मग ध्यानाची गरज असते. आपण ध्यान केले नाही तर आपला आत्मा वर जाऊन खाली येईल. पुन्हा वर जाईल, पुन्हा खाली येईल. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

अकाल मूरत है साध सन्तन की, ठहरने की ध्यान को।

ज्या महात्म्यांनी आपणांस नाम दिले आहे, त्या महात्म्यांचे आपण ध्यान धरावे. नाम दिल्यानंतर एखाद्या गुरूंनी दुसऱ्या दिवशी जरी शरीर त्यागले, तरीही त्या शिष्यासाठी त्याचे गुरू सदैव जिवीत असतात. नाम दिल्यानंतर महात्मा कधीच शिष्यांकडे दुर्लक्ष करीत नाहीत. सच्चखण्डामध्ये बसूनही ते आपले संरक्षण करीत असतात. ध्यान–अभ्यासामध्ये तुम्हांस काही अडचण असेल तर त्यांच्या जागेवर कार्यरत असलेल्या व्यक्तीस त्याबद्दल विचारा. तुम्ही इतके ध्यान करा की तुम्हांस स्वत:चेही विस्मरण व्हावयास हवे. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

आप छोड़ गुरू माहे समावे।

आपण जेव्हा नामस्मरणाद्वारे सूर्य, चंद्र व तारे पार करून आंतरिक मंडळांमध्ये जातो, तेव्हा आपल्या समोर गुरू स्वरूप आपोआपच प्रकट होते. तेथे पोहचल्यावरच आपण सतगुरूंचे खरे शिष्य बनतो. ते स्वरूप आपल्या समोर स्पष्ट स्वरूपात असते. आपण त्यांच्याशी कोणत्याही बाबतीत संवाद करू शकतो. त्याचे ते स्पष्ट व योग्य उत्तर देतात. ही बाब केवळ चर्वणविचर्वण करण्यासारखी नाही. गुरू सदैव सेवकांसोबत असतात. या पातळीपर्यंत आपले नामस्मरण आपणांस नेते. यापुढे सतगुरूंची जबाबदारी असते. परंतु आपण स्वत:चे आत्मपरिक्षण करून पहा! आपल्यापैकी किती अशी माणसे आहेत की ते एवढे नामस्मरण करतात, सतगुरूंकडून नामाचे देणे मागतात?

माझ्याकडे अशी बरीच पत्रे येतात तसेच प्रेमीजन देखील भेटण्यास येतात, परंतु मी इतका ध्यान–अभ्यास करतो वा पुढे करीन असे कोणीच म्हणत नाही. प्रत्येकजण आपआपल्या समस्या घेऊन माझ्याकडे येतात. महाराज सावन सिंहजी सांगत की जे लोक संतमतामध्ये आपल्या कोर्ट–केसचा निर्णय आपल्याच बाजूने व्हावा, आपला आजार दूर व्हावा वा माझी बेरोजगारी दूर व्हावी अशा आशेने येत असतील तर संतमतापासून त्यांना काय प्राप्त होईल? कबीर साहेब सांगतात:

दुनिया ऐसी दीवानी भाई, भक्ति भाव नहीं बूझे जी।
कोई आए तो दु:ख का मारया, हम पर कृपा कीजे जी।
कोई आए तो ब्याह की खातिर, सन्त गौसाई रीझे जी।
कोई आए तो दौलत मांगे, भेंट रूपया दीजे जी।
सच्चे को कोई ग्राहक नाहीं, झूठे जगत पतीजे जी।
कहत कबीर सुनो भई साधो, अन्धे को क्या कीजे जी।।

संत आपणांस या जगातून नेण्यासाठीच येतात. ते सांगतात की तुम्ही या अडीअडचणींच्या व संकटांच्या जगातून बाहेर पडा, स्वगृही परत चला. परंतु आपण या जगात वारंवार फसू इच्छितो, त्यासाठीच निरनिराळ्या मागण्या मागतो. स्वामीजी महाराज आपणांस समजावतात, ''तपश्चर्या करणारे तप करून–करून थकले, ध्यानस्थ बसणारे ध्यान करून–करून थकले, परंतु ज्या सतगुरूंनी आपणांस नाम दिले आहे, त्यांच्या गुरूस्वरूपाचे ध्यान आपण करावयास हवे होते जेथे आपण पोहचतच नाही.''

पंडित पढ़ पढ़ वेद बखानें। विद्या बल सब जाई।।

संतांची वाणी नेहमीच अशाप्रकारे गुंफलेली असते की आपण अगोरदच्या कडव्याचा अर्थ बरोबर समजून घेतला नाही तर पुढील कडव्याचे आकलन आपणांस होत नाही. संत कोणत्याही वेद–शास्त्राची निंदा करीत नाही. ते हे मात्र नक्कीच सांगतात की जो वेदांचा खरा अर्थ समजून घेत नाही व त्यावर अंमलबजावणी करीत नाही, तो कुचकामी असतो.

वेदांमध्ये दुसऱ्या पातळीवरचे ज्ञान आहे. कारण त्यांची निर्मितीच दुसऱ्या पातळीवर झालेली आहे. वेदांच्या मदतीने त्या पातळीपर्यंत आपण पोहचू शकतो, परंतु तिथपर्यंत जाण्यासाठीही आपण तयार नसतो. आपण रात्रंदिवस मुखाने धर्म–ग्रंथ, पोथी–पुराण वगैरे लिखित साहित्य वाचत असतो. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

वेद व्यापारी नानका लद न चलया कोय।

आम्ही एवढी पुस्तके, एवढे धर्म–ग्रंथ वाचले आहेत असे म्हणणारी माणसे मृत्यूनंतर त्यांच्यासोबत ही पुस्तके वा ग्रंथ नेतात का हे आपण पाहू. आपले वाड–वडिल हे साहित्य वाचून येथेच सोडून गेले, आपणही त्याचप्रमाणे ते येथे सोडून जाणार आहोत. या धर्मग्रंथांमध्ये जे काही सांगितले आहे त्यानुसार आपण जीवनाची वाटचाल करीत नाही, केवळ एकमेकांशी आपण वाद–विवाद घालण्यात पटाईत आहोत.

बाबा बिशनदासजींनी दिलेले उदाहरण मीदेखील देत असतो की दोन पंडित काशीहून खूप अभ्यास–ज्ञानार्जन करून घरी परतत असताना वाटेमध्ये त्यांना एक शेतकरी भेटला. शेतकऱ्याने त्यांना विचारले, ''पंडितजी! कोठून येत आहात.'' पंडितांनी उत्तर दिले,''आम्ही काशीहून विद्याग्रहण करून आलेलो आहोत, आम्ही अतिशय विद्वान आहोत.'' शेतकरी त्यांना म्हणाले, ''आज मला तुम्ही तुमची सेवा करण्याची संधी द्यावीत.'' ते शेतकऱ्याच्या घरी गेले. शेतकऱ्याने घरी स्वयंपाक करण्यास सांगितले. तेवढ्यात त्या दोन पंडितांपैकी एकजण म्हणाला, मी जरा बाहेर जाऊन येतो. शेतकऱ्याने दुसऱ्या पंडितास विचारले की,''यांचे आणि तुमचे कितपत शिक्षण झाले आहे?'' तो पंडित म्हणाला,''मी सर्व ज्ञान ग्रहण करून आलेलो आहे, परंतु हा तर निव्वळ बैल आहे, त्यास काही येत नाही.'' थोड्या वेळाने पहिला पंडित परतला व दुसरा पंडित बाहेर गेला. शेतकऱ्याने पहिल्या पंडितास विचारले, ''पंडितजी तुम्ही किती शिक्षण घेतले आहे व तुमच्या सोबत्याने किती शिक्षण घेतले आहे?'' त्यावर पंडिताने उत्तर दिले,''हा निव्वळ गाढव असून यास काहीच येत नाही. केवळ मीच संपूर्ण शिक्षण घेतले आहे.''

शेतकरी खूप समंजसपणे वागला. त्याने दोघांचीही हस्तप्रक्षालनाची व भोजनास बसण्याची व्यवस्था केली. एका थाळीमध्ये गाढवाचे खाणे तर दुसऱ्या थाळीमध्ये बैलाचा आहार ठेवला. दोन्ही पंडित ते पाहून आश्चर्यचकीत झाले की हे काय आहे? तो शेतकरी म्हणाला, ''हे पहा! तुम्ही यांना गाढव

संबोधले म्हणून हे गाढवाचे खाणे ठेवले आहे आणि तुम्ही यांना बैल म्हणालात म्हणून हा बैलाचा आहार ठेवलेला आहे.''दोन्ही पंडित लज्जित झाले. आम्हा विद्वान लोकांना एकमेकांची स्तुती करता येत नाही. आपण नेहमीच म्हणतो की मी इतरांपेक्षा जास्त विद्वान आहे. ही सवय अतिशिक्षित लोकांमध्ये असते.

आपले महाराज कृपाल सांगत असत की एका घरात हजारो संत एकत्र राहू शकतात परंतु दोन पोळ एका घरात राहू शकत नाहीत. अशीच आपली अवस्था आहे. आपण म्हणतो की मी इतरांपेक्षा जास्त ज्ञानी आहे, मी अधिक चांगले भाषण देऊ शकतो परंतु संतमत मात्र कमाई करण्याची वस्तू आहे.

मी सांगत असतो की एखाद्या मनुष्याने जर भौगेलिक शास्त्राचा अभ्यास केला असेल, तर तो आपणांस प्रत्येक शहराचे–बंदराचे नाव–वर्णन सांगेल. कारण त्यास नकाशाचे चांगले ज्ञान असते. परंतु दुसऱ्या मनुष्याने ती सर्व ठिकाणे स्वत: जाऊन पाहिलेली आहेत. आता तुम्ही सांगा जास्त विश्वासार्हता कोणाच्या सांगण्यामध्ये असेल? ज्याने स्वत: पाहिले आहे त्याच्या सांगण्यामध्ये अधिक विश्वासार्हता असेल. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

सन्तन की सुन साची साखी, जो बोलण सो पेखण आखी।

सज्जनहो! तम्ही जे काही बोलणार आहात, तो तुमचा स्वानुभव असावयास हवा. तुम्ही जर हे प्रात्यक्षिक केलेले नसेल तर तुमची फसवणूक झालेली आहे व तुम्ही इतरांची देखील फसवणूक करीत आहात. कबीर साहेब सांगतात, ''कागदाच्या होडीत बसून कोणी पार होऊ शकत नाही. इतरांची खात्री पटविता की आम्ही या भवसागरातून तरलो आहोत व तुम्हांसही तारू. परंतु आम्ही कोणासही कागदाच्या नावेत बसून पार होताना पाहिलेले नाही.''

बुद्धि चतुरता काम न आवे। आलिम रहे पछताई।

हा बौद्धिक विषय नाही. येथे रथी–महारथीनाही खूप अडचणी आलेल्या आहेत. स्वामीजी महाराज सांगतात:

हे विद्या तू बड़ी अविद्या, सन्तन की तू कदर न जानी।

याचा अर्थ तुम्ही ज्ञानार्जन करू नये असा होत नाही. परंतु तुम्ही जो काही अभ्यास करीत आहात, तो समजून त्यावर विचार करा.

और अमल का दखल नहीं है, अमल शब्द लौ लाई।।

आपण आता प्रेमाने सांगत आहात, ''आपण परमात्म्याची आपल्या अक्कल–हुशारीने वा इतर कोणत्याही पद्धतीने फसवणूक करू शकत नाही. तेथे आपणांस शब्द–नामाची कमाई करावी लागते, स्वत:स परमात्म्यापुढे अर्पण करावे लागते. सतगुरू आपणांस जे काही सांगतात, सर्वप्रथम त्यावर आपणांस अंमल करावा लागतो. आपणांस अंत:करणापासून, मेहनतपूर्वक आणि प्रेमपूर्वकरित्या शब्द–नामाची कमाई करणे गरजेचे असते. इतर कोणत्याही पद्धतीने तुम्ही यशस्वी होऊ शकत नाही.''

गुरू मिले जब धुन का भेदी। शिष्य विरह धर आई।

प्रियजनहो! आजकाल तर जग तऱ्हेतऱ्हेच्या गुरूंनी तुडुंब भरलेले आहे. कबीर साहेब सांगतात:

गुरू जिन्हां का अंधला, चेले कहाँ कराई।

मुलास वडिलांची मालमत्ता वारसाहक्काने प्राप्त होते. परंतु जर वडिलांकडे कोणत्याच प्रकारची मालमत्ता नसेल, तर मुलांच्या वाटेस काय येईल? ते दु:खी होतील, त्यांना मजुरी करावी लागेल.

साहब जिसदा भूखा नंगा होवे, तिसदा नफर कित्थों रज खाए।
साहब घर वथ होऐ नफर हथ आए, अनहोंदी कित्थो पाए।
गुरू सदाए अज्ञानी अंधा कित्थो मार्ग पाए।।

गुरू नानकदेवजी महाराज आपणांस प्रेमाने सांगतात, ''हे पहा प्रियजनहो! तुमचा पिता जर सच्चखण्डात वास करणारा असेल, तर तो तुम्हांस देखील सच्चखण्डात नेऊ शकतो.'' कारण ज्याने विद्याग्रहण केली आहे तोच इतरांना शिकवू शकतो. कोणत्याही महात्म्यास शरण जाण्यापूर्वी त्यांचे जीवनचरित्र

वाचा. काय त्या महात्म्यांनी दहा–वीस वर्षे सांसारिक गोष्टी त्यागून ध्यान–अभ्यास केला आहे का? हे जाणून घ्या. निद्राधिन राहून कोणासही परमात्मा प्राप्त होऊ शकत नाही. जर कोणी असा दावा केला की मला निद्रावस्थेमध्येच परमात्मा लाभला, तर ते खोटे आहे. आजपर्यंत सर्व महात्म्यांनी मेहनत केली व ज्यांनी मेहनत केली त्यांनाच परमात्मा प्राप्त झाला.

तुम्ही गुरू नानकदेवजींचा इतिहास वाचून पहा! ते अकरा वर्षे कंकर–खड्यांवर झोपले, अक्क–आहार केला. जर सतगुरू शब्द–स्वरूपी, शब्द–अभ्यासी असतील व शिष्याच्या अंतरात तळमळ असेल तर मग या दोघांची भेट म्हणजे एखाद्या तहानलेल्या व्यक्तीस पाणी मिळाल्यासारखे आहे.

कबीर साहेब सांगतात,''तहानलेला मनुष्य पाणी अतिशय आत्मियतेने पितो. परंतु ज्यास तहान लागलेली नसते तो व्यर्थ विचारपूस करतो की हे पाणी हिंदूंचे आहे की मुसलमानाचे? खरा तहानलेला काही विचारत नाही.''

मी सकाळी सांगितले की मी एक पामर जीव होतो. माझे सतगुरू स्वत: धैर्याने माझ्याकडे आले आणि त्यांनी माझ्या आत्म्याची तहान भागविली. तुमची जात कोणती? तुम्ही गृहस्थी आहात की त्यागी आहात? असा कोणत्याही प्रकारचा प्रश्न मी त्यांनी विचारला नाही. मी तहानलेलो असल्याने त्यांनी सांगितल्यानुसार मी केले.

गुरू शब्द–स्वरूपी आणि शब्द–अभ्यासी असतील व शिष्याच्या अंतरात त्यांच्या मिलनासाठी विरह व तळमळ असली तर मग पहा कसे त्यांचे ईसिप्त साध्य होते. गुरू परिपूर्ण असतील परंतु जोपर्यंत त्यांना परिपूर्ण शिष्य लाभत नाही तोपर्यंत अशा गुरूंची देखील पारख होत नाही. शिष्य परिपूर्ण असल्यास पाखंडी गुरू त्याच्यापासून दूर पळेल, कारण त्यास जाणीव असते की हा शिष्य आपल्याकडून काही अध्यात्मिक वस्तू मागेल, परंतु आपण ती कोठून देणार? कारण आयुष्यभर नामाची कमाई केलेली नसते.

सुरत शब्द की होय कमाई। तब मन कुछ ठहराई।।

आपण सांगता,''केवळ नाम घेणे वा परमार्थिक मार्ग मिळणेच पुरेसे नसते. गुरूंनी ध्यान–अभ्यास करण्यास सांगितलेल्या पद्धतीनुसार दररोज अभ्यास करणेही गरजेचे असते. आपल्या अंतर्यातील मार्ग मोकळा होतो.'' कबीर साहेब सांगतात:

गुरू बेचारा क्या करे जे सिक्खन में चूक।
अंधे एक न लग्गी ज्यों बाँस बजाई फूँक।।

हिर्स हवस से हाथ न आवे। तन मन देव चढ़ाई।।

आता स्वामीजी महाराज सांगतात, ''या जगामधील लालची लोकांना परमात्मा प्राप्त होत नाही. तुमच्या हृदयात परमात्मा प्राप्तीसाठी खरी तळमळ असेल, विरह असेल तर तुम्ही तुमचे तन–मन देखील गुरूंना अर्पण करा.''

बुल्हवसी और कपटी जन को। नेक न धुन पतियाई।।

या जगामधील लालची लोकांना कधीच धुन ऐकू येत नाही. शब्दाची निर्मिती सच्चखण्डात होऊन तो आपल्या दोन्ही नेत्रांच्या दरम्यान निनादतो. जसे अजगर कधीही शिकार करण्यासाठी पारधामागे धावत नाही, तो एके ठिकाणी शांतपणे बसून राहतो. पारध जेव्हा त्याच्या जवळ येते, तेव्हा तो त्यास स्वत:कडे खेचून घेतो. याचप्रमाणे आपण जेव्हा नाम–स्मरणाद्वारे आपली नऊ द्वारे त्यागतो, तेव्हा आपला आत्मा शब्दाच्या हद्दीत येतो. तेथे शब्द ताबडतोब आपल्या आत्म्यास स्वत:कडे खेचून घेतो.

यह धुन है धुर लोक अधर की। कोई पकड़ें संत सिपाही।।

परमात्म्याच्या दरबारामध्ये धुन निर्माण होते. गुरू नानकदेवजी तिला गुरूबाणी, मुस्लीम फकीर तिला कलमा वा बाँगे आसमानी असे संबोधतात, कारण ती आकाशातून येत असते. एखादा धाडशी, बहादुर मनुष्यच मन–इंद्रियांपासून स्वत:ची सुटका करून घेऊन, ही धुन पकडतो.

मन को मार करें असवारी। गगन कोट वह लेयँ घिराई।।
खाई सुन्न पार मैदाना। महासुन्न नाका परमाना।।

आपल्या आत्म्यावर स्थूल, सूक्ष्म आणि कारण अशी तीन आवरणे आहेत. आपण जेव्हा नामस्मरणाद्वारे आपली नऊ द्वारे रिक्त करून दोन्ही नेत्रांच्या मधोमध एकाग्र होतो, तेव्हा आपण सहस्त्रदल कमल, गगन त्रिकुटीमध्ये जातो. तेथे आपले मन आपणांस वश होते. आपण असेदेखील म्हणू शकतो की आपल्या आत्म्याची मनाच्या कैदेतून सुटका झालेली आहे. पुढे आपण पारब्रह्मामध्ये पोहचतो जेथे स्त्री व पुरुष असा फरक नसतो. तेथे केवळ आत्माच असतो. तेथे पोहचलेल्या आत्म्याचा प्रकाश बारा सूर्यांच्या प्रकाशा एवढा असतो. हा सच्चखण्डाचा नाका आहे. तेथे पोहोचल्यावर आत्म्याच्या लक्षात येत की मी आत्मा आहे. मी विनाकारण बाहेर शरीररूपी पिंजऱ्यात अडकून पडलो. त्या पिंजऱ्याच्या प्रेमात पडून कधी हिंदूंची तर कधी मुसलमानांची भाषा बोलत राहिलो. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

सुहट पिंजर प्रेम का बोले बोलनहार। सच चुगे अमृत पिए उडे ते एके बार।।

या आत्म्याने जर शरीररूपी पिंजऱ्याच्या आकर्षणाचा त्याग करून अंतर्यात सातत्याने गुंजत असलेल्या शब्द–नामाचे दाणे टिपल्यास तो एकदाच या जगामध्ये येईल, त्यानंतर तो आपल्या स्वगृही पोहोचेल.

भँवरगुफा का फाटक तोड़ा। शीश महल सतगुरू दिखलाई।।

आपल्या अंतरामध्ये जेव्हा संत–सतगुरू प्रगट होतात, नामस्मरणाद्वारे जेव्हा आपण अंतर्यात गुरूस्वरूपापर्यंत पोहोचतो, ते स्वत:च आपले मार्गदर्शन करतात आणि आपणांस भँवर गुंफेपर्यंत घेऊन जातात. भुँवर गुंफा सच्चखण्डाचे प्रवेशद्वार असून, तेथे पोहोचून आत्मा तल्लीन होऊन जातो.

येथे पोहोचल्यावरच मंसूरने उच्चारले होते की जो कोणी खुदा वा परमात्मा आहे तो मीच आहे. परंतु मौलवींना मंसूरच्या आंतरिक जाणीव नव्हती की याची अंतर्यात कोठपर्यंत पोहोच आहे वा तो किती महान आहे? त्यामुळे त्यांनी मंसुरला फासावर चढविले. तेथे पोहचल्यावर आत्म्यास शुद्ध येते. पुढे स्वगृही जाण्याच्या तयारीला लागतो. सतगुरू खूप कृपा करून पुढे प्रत्येक टप्प्या–टप्प्यावर त्याच्या सोबत राहतात.

अद्‌भुत लीला अजब वहाँ की। किरन किरन सूरज दरसाई।।

येथे एक सूर्य असूनही त्याचा किती प्रकाश, उजेड जाणवतो? तेथे तर खूपच वेगळे चित्र आहे. तेथे सूर्य–चंद्रांच्या रांगाच रांगा आहेत. त्यांच्या प्रकाशाचे वर्णन होऊच शकत नाही. ज्या देशामध्ये संत–सतगुरू आपणांस नेऊ इच्छित आहेत, त्या देशाचा महिमा आपण कसा वर्णन करू शकतो? हे सर्व आत्मा त्याच देशातून या जगात आलेले आहेत.

सूरज सूरज जोत निरारली। चन्द्र कोटिन छबि छाई।।
घट अकाश औघट परकाशा। लख अकाश कोटिन परसाई।।

जे लोक त्या देशात पोहचलेले असतात, त्यांनाच तेथील माहिती असते. परंतु जग त्यांच्या सांगण्यावर विश्वास ठेवत नाही. जेव्हा गुरू नानकदेवजी महाराजांनी म्हटले की अशी लाखो आकाशे व पाताळे आहेत, तेव्हा लोकांनी त्यांच्या बोलण्यावर आक्षेप घेतला. तरीही ते म्हणाले की तुम्ही चला! मी हे सर्व तुम्हांस दाखवू शकतो की हे सर्व तुमच्या अंतर्यातच आहे, बाहेर नाही.

स्वामीजी महाराजदेखील हेच सांगतात, ''सतगुरूंच्या कृपेने आमचा आत्मा अनेक आकाश पाहत–पाहत पुढे जात आहे.''

यह लीला कुछ अजब पेच की। उलट पलट कोई गुरूमुख पाई।।

ह्या सर्वांचा संबंध स्वानुभवाचा आहे तरीही संत–महात्म्यांनी धर्म–ग्रंथांमध्ये थोडीफार माहिती सांगितली आहे की येथील करोडो सूर्यांचा प्रकाश जरी एकत्र केला तरी याची तुलना तेथील प्रकाशाशी होऊ शकत नाही. मुक्या मुनष्याने मिठाई खाल्ल्यावर जर आपण मिठाईच्या चवीबद्दल त्यास विचारले, तर तो काहीच सांगू शकत नाही. भीखा साहेब सांगतात:

भीखा बात अगम की, कहन सुनन में नाहें।
जो जाने सो कहे न, कहे सो जो जाने नाहें।।

कहां लग बरनूँ भेद अगाधा। जो कोई लावे सुन्न समाधा।
समज बूझ गूंगे गुड़ खाई। समज बूझ गुंगे गुड़ खाई।
अकथ अकह की बात निराली। क्योंकर कहूँ बनाई।
राधास्वामी राज छिपे को। परगट कर सरसाई।।

स्वामीजी महाराजांनी या लहानशा वाणीमध्ये संतमताबद्दल, गुरूमताबद्दल अतिशय प्रेमाने सांगितले आहे की परमात्मा प्राप्तीसाठी आत्म्यास जो काही अडथळा आहे तो आपल्या मनाचाच आहे. मन बाह्यजगातील कोणत्याही साधनाने वा उपायाने वश होत नाही. त्यास जर आपण अंतर्यातील राग, शब्दधुन–वाणी ऐकवली तरच तो आपल्या ताब्यात येईल.

मनास वश करण्यासाठी आपण उपाय–योजना करणे आवश्यक आहे. आपण केवळ शब्द–नामाचा आस्वाद देऊनच त्यास वश करू शकतो.

***



प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
संतबानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान – ३० सप्टेंबर १९८७

एक प्रेमी: *मी असे ऐकले आहे की बालपणी तुम्हाला मलेरिया झाला होता. त्याचा तुमच्या सध्याच्या आजारपणाशी काय संबंध आहे?*

बाबाजी: बंधूंनो! मला बालपणी मलेरिया झाला नव्हता. मी आपला जास्तीतजास्त वेळ जमीनीखालील गुहेत बसून ध्यान–अभ्यासात व्यतीत केला. मी सांसारिक व्यक्तींशी भेट–गाठ कमीच करीत असे. जेव्हा माझी भेट पश्चिमी देशांतील प्रेमींशी झाली आणि पश्चिमी आत्म्यांनी खूप प्रेम दर्शवले तेव्हा हुजूर कृपालजींनी आदेश दिला की मी पश्चिमी देशात जाणे गरजेचे आहे. तेव्हा मला बाह्यदेशातील हवामानाचा सामना करावा लागला.

मी कधीही बाहेरील वातावरणात गेलो नव्हतो. खासकरून जेव्हा मी दिल्लीला गेलो तेव्हा अशा गर्दी–दाटीच्या ठिकाणी जाण्याचा माझा पहिलाच प्रसंग होता. दिल्लीत खूप डास होते व तेथे मला मलेरिया झाला, ज्यास मला अनेक वर्षे तोंड द्यावे लागले. कधी अंगात ताप चढत असे तर कधी उतरत असे.

माझ्या अंगात अमेरिकेतील संतबानी आश्रमात पुन्हा एकदा मलेरियाचा ताप भरला. ज्या अमेरिकेतील डॉक्टरांनी माझा इलाज केला त्यांचा मी आभारी आहे. त्या डॉक्टरांनी सांगितले की आता तुम्हाला पुन्हा आमच्या देशात मलेरिया होणार नाही, परंतु हिंदुस्थानात जाऊन पुन्हा मलेरिया नाही होणार याची शाश्वती आम्ही देऊ शकत नाही. गेल्या वर्षी जानेवारी महिन्यात मला पुन्हा याच रोगाने आजारी केले.

जेव्हा हवापालट होते तेव्हा मी आजारी पडतो. जसे मी आपणांस झोपेच्या सवयीचे उदाहरण देऊन समजावले होते की ज्या मनुष्यास दहा

तास झोपायची सवय असते, तो मनुष्य जर फक्त दोन तास झोपला तर तो आजारी पडेल. जेव्हा मी रहाण्यासाठी एकदम निराळ्या ठिकाणी जातो तेव्हा माझ्या तब्येतीवर तेथील वातावरणाचा परिणाम होतो.

मी जेव्हा बाह्यदेशात दौऱ्यावर जातो तेव्हा माझ्यासाठी रहाण्याची फार छान व्यवस्था केली जाते. माझ्या तब्येतीची खास निगा घेतली जाते. मला फेरफटका मारण्यासाठी जागेचा प्रबंध केला जातो. पश्चिमी देशातील सत्संगी बंधू–भगिनी खूप शिस्त पाळतात. जर मी बाहेर फेरफटका मारत असल्यास तेथे कोणताही प्रेमी येऊन मला त्रास देत नाही. परंतु भारतात ठिक उलट केले जाते. मी जिथे फिरत असतो नेमके तेथेच प्रेमी येतात. मी तेथे पाच–सहा दिवस रहातो, सुरवातीच्या एक–दोन दिवसात मला काही त्रास होत नाही, परंतु तीसऱ्या–चौथ्या दिवशी मात्र मला त्रास जाणवू लागतो.

गेल्या जानेवारी महिन्यात जेव्हा मी मुंबईला गेलो होतो तेव्हा मला ताप किंवा सर्दी काही झाली नाही, परंतु मी इतका कमजोर झालो की मला स्टेजपर्यंत चालत जाणे देखील कठीण झाले. असेच बेंगलोर येथे देखील घडले. माझ्या तब्येतीची काळजी घेणे प्रेमींचे कर्तव्य असते. मी त्यांना जरूर सांगतो व पप्पूदेखील त्यांना माहिती देत असतो परंतु माझ्या रहाण्याची व्यवस्था नाइलाजाने अशा ठिकाणी केली जाते जिथे बाहेरची हवा व उजेड येत नाही, त्यामुळे मला कोंडमारा झाल्यासारखे वाटू लागते. तेथे मला ना ताप चढतो ना सर्दी–खोकला होतो परंतु मी कमजोर होतो.

मी आपल्या जीवनात स्वादू बनलो नाही. बाबा बिशनदासजींनी आपल्या जीवनात कधी मीठ आणि गोड खाल्ले नाही. आपण आपल्या जीवनात खूप तहान–भूक सहन केली. माझ्यावर आपला जास्त नव्हे परंतु थोडासा रंग जरूर चढलेला आहे. माझी अन्न खाण्याची क्षमताच मुळी संकुचित पावलेली आहे. मी एखादी मसालेदार भाजी खाऊ शकत नाही. जेव्हा माझा स्वयंपाक करणारी व्यक्ती बदलली तर त्याचा माझ्या तब्येतीवर हमखास परिणाम

होतो. स्वयंपाक करणारी व्यक्ती चांगले भोजन बनण्याचा प्रयत्न करते की बाबाजींसाठी भोजन बनविले जात आहे. स्वयंपाकातील उणीवा काढण्याची मला सवय नाही. मी उपाशी रहातो परंतु त्याने तयार केलेल्या भोजनातील दोष काढत नाही. जर मी एक केळे खाल्ले तर मी भोजन करू शकत नाही व जर एखादे सफरचंद खाल्ले तर मी कमी जेवतो.

आपणांस कल्पना आहे की मी कमी आहार खातो आणि तेदेखील हवे तसे साधे मिळाले नाही तर आपण जाणताच की आपला देह अन्नाच्या आधारेच कार्यरत असतो. आपण एखादी मशीन नाही आहोत. अशा तऱ्हेने आपण किती दिवस काम करू शकू? मी वारंवार चहा पित नाही. मी जास्त दूध आणि साखर घातलेला चहा पित नाही. बिना साखरेचा चहा पिऊन मला आनंद होतो. सर्वसाधारणपणे मी दिवसातून दोनदाच जेवतो. असे नाही की कधी हे खाल्ले तर कधी ते खाल्ले. माझ्या खाण्याची सवय तशी नाही.

मी आजवर बहुतकरून निरोगीच राहिलो आहे. मी माझ्या जीवनात कोणत्याही दीर्घ आजाराचा सामना केलेला नाही. सन् १९८४ साली माझ्या शरीरातून खूप रक्त वाहले. ही त्या दयाळू कृपालजींची मर्जी होती. त्यांनाच माहीत की इतके रक्त का निघाले? माझ्या जीवनात मला एकदाच मलेरिया झाला. त्याखेरीज मी माझ्या बहुतांश जीवनात सुदृढ आरोग्याचा आनंद घेतला. माझ्या शरीरात कमजोरी मला आजारपणामुळे आलेली नाही.

मी जीवनात सदैव कमी आहार खाल्ला आणि जास्तीतजास्त ध्यान–अभ्यास केला. मी धावण्याच्या शर्यतीत खूप वेगाने धावत असे, आजवर मी शर्यतीत कोणासही आपल्या पुढे जाऊ दिले नाही. लांब उड्या मारण्याच्या शर्यतीतदेखील मी पारंगत होतो.

आपण केवळ एकच रस घेऊ शकतो, एकतर इंद्रियभोगांचा रस घेऊ शकतो अथवा परमात्म्याच्या भक्तीचा रस घेऊ शकतो. हे जेव्हा आपण ध्यान–अभ्यास करतो तेव्हाच आपल्या लक्षात येते. मी आपल्या जीवनात

खूप कमी औषधांचे सेवन केले आहे. कोणतेही खास ताकद देणाऱ्या पदार्थांचे सेवनदेखील मी कधी केले नाही. मी सदैव त्यांच्यापासून दूर रहाण्याचा प्रयत्न केला.

पप्पूला माहितच आहे कारण तो सदैव माझ्यासोबत रहातो. पप्पूच्या कुटुंबासही माझ्या आहाराविषयी पूर्ण माहिती आहे. जर पप्पूच्या कुटुंबातील निराळ्या व्यक्तीने माझ्यासाठी स्वयंपाक केला तर त्याचा माझ्या तब्येतीवर परिणाम होतो. मी अगोदरपासून त्या कुटुंबात जातो. मी त्यांना ज्याप्रकारचे भोजन बनविण्यास सांगतो, ते तसेच भोजन बनवितात. इथे माझी मुलगी बलवन्त माझे भोजन बनविते.

मी आपल्या जीवनात कित्येक दिवस आहाराखेरीज राहिलो आहे. तारुण्यात मन–इंद्रियांवर नियंत्रण करणे ही काही साधी सोपी गोष्ट नसते. सूळावर चढणे सोपे असते परंतु मन–इंद्रियांच्या भोगांपासून दूर रहाणे खूप कठीण असते. कबीर साहेब सांगतात:

हँस हँस पिया न पाया जिन पाया तिन रोए।
हँसे खेडे पिया मिले तो कौन दुहागण होय।।

बाबा सावन सिंहजींकडे जे सेवादार रहात असत ते महाराज नोकरी करीत असतानादेखील त्यांच्यासोबतच रहात असत. मला त्या सेवादारांना भेटण्याची खूप चांगली संधी लाभलेली आहे. माझे त्यांच्याशी खूप स्नेहसंबंध होते. ते सांगत असत की बाबाजींनी कशाप्रकारे आपल्या आहारावर संयम पाळला होता. अगोदर ध्यान–अभ्यास करीत असत आणि त्यानंतरच भोजन करीत असत. बाबाजींचा एक खास स्वयंपाकी होता. त्यास त्यांनी सांगून ठेवले होते की,''तू स्वत:चे भोजन तयार करून खात जा व माझे भोजन बनवून याजागी ठेवत जा. माझी वाट पहाण्याची गरज नाही.''

***

धीर आणि संतोष

परमसंत अजायब सिंहजी महाराजांनी गोष्टीरूपात समजावलेले
एक महत्वपूर्ण अध्यात्मिक तत्व

रोम देशातील राजाच्या इतिहासातील एक घटना आहे. एकदा त्याच्या दरबारात धीर आणि संतोष या विषयावर प्रश्न उभा राहिला. राजाने आपल्या मंत्रीमंडळास विचारले,''धीर आणि संतोष यांचा अर्थ काय?'' राजाच्या दरबारात खूप सुशिक्षित विद्वान मंत्री होते. त्या सर्वांनी आपआपल्या बुद्धीनुसार या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांची उत्तरे ऐकून राजा संतुष्ट झाला नाही. राजाने आपल्या मुख्यमंत्र्यासही विचारले की धीर आणि संतोष म्हणजे काय? मुख्यमंत्र्याने धीर आणि संतोष याविषयी समजावण्याचा प्रयत्न केला परंतु तो राजाच्या प्रश्नाचे समाधानपूर्वक उत्तर देऊ शकला नाही.

राजाने आपल्या मुख्यमंत्र्यास सांगितले की,''मी असे ऐकले आहे की भारतात औरंगजेब नावाचा एक खूप मोठा बादशहा आहे. तो खूप विद्वान आणि सुशिक्षित बादशहा असून त्याच्या दरबारात खूप विद्वान मंत्री आहेत. तू तेथे जाऊन त्यांना याविषयी प्रश्न विचार आणि जेव्हा तुला समाधानपूर्वक उत्तर मिळाल्यानंतरच परत ये. जर ते या प्रश्नाचे समाधानपूर्वक उत्तर देऊ शकले नाहीत तर तू तेथे शर्मद नावाच्या एका फकीरास शोध. मी ऐकले आहे की शर्मद एक श्रेष्ठ व ज्ञानी फकीर आहे. तो तुला याप्रश्नाचे उत्तर देऊ शकेल. तू भारतात जाऊन उत्तर आण की धीर व संतोष याचा अर्थ काय?

मुख्यमंत्री भारतात गेला व औरंगजेबास भेटला. मुख्यमंत्र्याने औरंगजेबास धीर आणि संतोष या शब्दांचा अर्थ विचारला. औरंगजेब खूप विद्वान होता, त्याने मुख्यमंत्र्यास समजावण्याचा प्रयत्न केला परंतु मुख्यमंत्र्याचे त्याच्या उत्तराने समाधान झाले नाही. मुख्यमंत्र्याने दरबारातील इतर मंत्र्यांशीदेखील चर्चा केली. सर्वांनी चांगल्याप्रकारे समजावण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचे कोणाच्याही उत्तराने समाधान झाले नाही.

शेवटी मुख्यमंत्र्याने तेथील लोकांना शर्मद फकीर कुठे आहेत ते विचारले. तेव्हा लोकांनी त्यास सांगितले की औरंगजेब अत्यंत कट्टर धार्मिक प्रवृत्तीचा असून त्याने कोणत्याही फकीरास अथवा संत–महात्म्यास बाहेर स्वतंत्र रहाण्यास परवानगी दिलेली नाही, सर्व संत–फकीरांना त्याने तुरूंगात कैद करून ठेवलेले आहे. आता फकीर शर्मद नेमके कुठे आहेत हे सांगणे कठिण आहे. ते जिथे कुठे असतील त्यांची परिस्थिती खूप बिकट व केविलवाणी असावी. त्यास अंगावर घालण्यास साधी वस्त्र देखील नसावीत, त्यास धड अन्न देखील मिळत नसावे आणि त्यास पिण्यासाठी दिवसभरात केवळ एक ग्लास पाणीच मिळत असावे. त्यास शोधणे फारच कठिण काम आहे.

मुख्यमंत्र्यास शर्मद फकीरास शोधून त्याच्याकडून राजाच्या प्रश्नाचे उत्तर जाणून घेणे गरजेचे होते. त्यामुळे तो फकीराचा शोध घेऊ लागला. आपण जाणता की जेव्हा आपण एखादे काम खूप श्रद्धेने व मेहनतीने करतो तेव्हा आपण त्यात यशस्वी होतो. शेवटी मुख्यमंत्र्यास शर्मद फकीर तुरूंगातील एका अंधारकोठडीत सापडले. त्यांच्या अंगावर कपडे नव्हते व ते दीनवाण्या परिस्थितीत होते. मुख्यमंत्र्याने पाहिले की औरंगजेबाने सोबत पाठविलेल्या मनुष्याने विनाकारण शर्मदना चाबकाने मारावयास सुरूवात केली, परंतु शर्मद कोणतीही तक्रार न करता सर्व काही धीर धरून सहन करीत राहिले.

त्यानंतर मुख्यमंत्र्याने पाहिले की एक मनुष्य शर्मदना एक कप पाणी आणि एक शिळी–कोरडी भाकर देऊन गेला. शर्मदनी त्यास परमात्म्याची मर्जी मानून अत्यंत संतुष्टीने ती भाकर खाल्ली. तेव्हा मुख्यमंत्र्याने शर्मदना प्रश्न विचारला,''धीर आणि संतोष यांचा अर्थ काय?'' शर्मदनी म्हटले मी तुला या प्रश्नाचे उत्तर उद्या देईन. जेव्हा उद्या तू माझ्याकडे येशील तेव्हा एक मोठी चादर व सोबत पाण्याने भरलेली पखाल घेऊन ये.

दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री शर्मदजींकडे एक मोठी चादर व सोबत पाण्याने भरलेली पखाल घेऊन आला. शर्मदनी आपल्या दयादृष्टीने तुरूंगाचा दरवाजा उघडला आणि त्याने मुख्यमंत्र्यास आत येऊ दिले. शर्मदनी त्या पाण्याने

स्नान केले व कापडी चादरीने आपले अंग झाकले. शर्मदनी मुख्यमंत्र्यास ध्यान–अभ्यासात बसविले आणि स्वत:ही ध्यानात बसले. शर्मद मुख्यमंत्र्याच्या आत्म्यास परमात्म्याच्या दरबारात घेऊन गेले. परमात्म्याच्या दरबारात मुख्यमंत्र्याने पाहिले की इतर आत्मा शर्मदजींशी बोलत होते. ते आत्मा शर्मदजींना सांगत होते की तुम्ही म्हणत असाल तर आम्ही औरंगजेब आणि त्याच्या राज्यास नष्ट करू शकतो कारण तो तुम्हांस खूप दु:ख–वेदना देत आहे. परंतु शर्मदनी सर्वांपुढे हात जोडून त्या आत्म्यांना म्हटले,''औरंगजेब आणि त्याच्या सैनिकांना कोणीही इजा पोहोचवू नये, त्यास क्षमा केली जावी कारण त्यास माहीत नाही की तो काय करीत आहे.''

मुख्यमंत्री हे सर्व पाहून थक्क झाला की शर्मद परमात्मारूप असून त्यांच्यात परमात्म्याची सर्व शक्ती उपस्थित आहे, तरीही त्याच्या अंतरात परमात्म्याच्या मर्जीत रहाण्यासाठी धीर व सोशिकपणा आहे, तसेच औरंगजेबाने त्यांस इतकी दु:खं–वेदना दिली तरीही त्यास वाटते की कोणीही औरंगजेबास इजा वा नुकसान पोहोचवू नये. मुख्यमंत्री शर्मदांची खरी भव्यता व अंतर्यातील श्रेष्ठ स्थानप्राप्ती पाहून अत्यंत प्रभावित झाला. जेव्हा शर्मदनी मुख्यमंत्र्यास आंतरिक मंडळातून खाली परत आणले तेव्हा शर्मदनी मुख्यमंत्र्यास विचारले, ''आता तुला तुझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले का? जर तुमच्यापाशी परमात्म्याने दिलेली सर्वशक्ती उपस्थित असूनही तुम्ही त्या शक्तीचा वापर करीत नाही याचा अर्थ असा आहे की तुम्ही परमात्म्याच्या मर्जीत संतुष्ट आहात.''

शेख फरीद साहेब देखील सांगतात की परिपूर्ण गुरू परमात्म्याचे प्रियजन असतात, त्यांच्या अंतरात खूप धीर असतो. ते परमात्म्याच्या मर्जीत संतोष मानतात. ते परमात्म्याच्या निकट असूनही ते लोकांना सांगत नाहीत की त्यांनी परमात्म्यास प्राप्त केलेले आहे.

जसे शर्मद मुख्यमंत्र्यास आंतरिक उच्च मंडळांमध्ये घेऊन गेले व त्यांनी त्यास दाखवले की सर्वकाही परमात्म्याच्या मर्जीनुसार होत आहे, तेव्हा आपणांसही परमात्म्याच्या मर्जीत संतुष्ट राहिले पाहिजे. ***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
संत-बानी आश्रमातील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती



परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या अपार दयेने संतबानी आश्रम, १६ पी एस राजस्थान येथे सत्संगाचे कार्यक्रम निम्नलिखीत दिवशी आयोजित होत आहेत. संगतच्या चरणी नम्र विनंती आहे की त्यांनी सत्संगात सहभागी होऊन संतवचनांचा व ध्यान-अभ्यासाचा लाभ घ्यावा.

२८ ते ३० ऑक्टोबर २०१६

२५ ते २७ नोव्हेंबर २०१६

२३ ते २५ डिसेंबर २०१६